**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**माहिती व जनसंपर्क विभाग**
**प्रसिद्धीपत्रक**

- **भाईंदर पश्चिम स्टेशन रोड परिसरातील रस्त्यावरील तसेच पदपथावरील अनधिकृत छपरे, हातगाड्या आणि शाळा परिसरातील १०० मीटर पर्यंत असलेल्या पानटपऱ्यांवर मिरा-भाईंदर महानगरपालिकेची कारवाई**

दिनांक १५ ऑक्टोबर २०२५ रोजी मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर पश्चिम स्टेशन परिसरातील पदपथावरील तसेच गाळ्यासमोरील अनधिकृत छपरे, शाळांच्या १०० मीटर परिसरातील तंबाखूजन्य पदार्थ व गुटखा विक्रेते करणाऱ्या 9 पानटपऱ्या, हातगाड्यांवर मोठ्या प्रमाणात कारवाई करण्यात आली. महानगरपालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन विभागामार्फत या कारवाईसाठी जेसीबी यंत्रणेचा वापर करून अनधिकृत बांधकामे व छपरे हटवून परिसर स्वच्छ करण्यात आला.

गेल्या काही आठवड्यांपासून मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात अनधिकृत बांधकामांविरुद्ध कठोर मोहिम राबविण्यात येत असून, अनेक अनधिकृत बांधकामे जमीनदोस्त करण्यात आल्या आहेत. या कारवाईचे उद्दिष्ट शहरातील सार्वजनिक जागा आणि पदपथ मुक्त करणे, नागरिकांना सुरक्षित आणि स्वच्छ वातावरण उपलब्ध करून देणे हे आहे.

ही कारवाई मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांच्या निर्देशानुसार करण्यात आली. मा. आयुक्त यांनी शहरातील अनधिकृत बांधकामे, फेरीवाले आणि सार्वजनिक ठिकाणांवरील अतिक्रमणांविरुद्ध कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अतिरिक्त आयुक्त संभाजी पानपट्टे आणि उपायुक्त (अतिक्रमण विभाग) कल्पिता पिंपळे यांच्या नेतृत्वाखाली सर्व प्रभागातील अतिक्रमणांवर काटेकोरपणे कारवाई केली जात आहे.

या पार्श्वभूमीवर झालेल्या आढावा बैठकीत उपायुक्त यांनी सर्व प्रभाग अधिकाऱ्यांना त्यांच्या विभागातील अनधिकृत बांधकामे, फेरीवाले, गॅरेजेस, पदपथावरील व्यावसायिक, अनधिकृत होर्डिंग्ज आणि झोपड्या यांच्यावर तातडीने कारवाई करण्याचे आदेश दिले. त्यानुसार, प्रभाग समिती क्रमांक ०२ अंतर्गत भाईंदर पश्चिम स्टेशन रोड परिसरात ही व्यापक कारवाई करण्यात आली. कारवाईदरम्यान संबंधित विभागाचे अधिकारी, कर्मचारी, तसेच पोलीस विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. मिरा-भाईंदर महानगरपालिका नागरिकांना आवाहन करते की, अनधिकृत बांधकामे किंवा सार्वजनिक जागेवरील अतिक्रमण करू नयेत. नियमांचे पालन करून शहर स्वच्छ, सुंदर आणि सुव्यवस्थित ठेवणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी असल्याचे मा. आयुक्तांनी सांगितले. मिरा-भाईंदर महानगरपालिका शहराच्या विकासासाठी, शिस्तबद्ध शहरी व्यवस्थेसाठी आणि नागरिकांच्या सोयीसाठी सातत्याने प्रयत्नशील असून, पुढील काळातही या प्रकारची कारवाई अधिक व्यापक स्वरूपात राबविण्यात येणार आहे.